**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक २८/२००८ मधील नि.२३८ खालील आदेश**
**(शंकर शामराव कदम वि. अजित पांडुरंग दगडे (सुर्यवंशी) वगैरे–२०)**
**(MHSN090005372008)**

सि.पी.सी. ऑर्डर १४ रुल ५ व ६ प्रमाणे प्रस्तुत दाव्यातील नि.३८ कडे काढलेले मुद्दे रिकास्ट करणेबाबत व जादा मुद्दे काढणेबाबत सदरचा अर्ज वादी यांनी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनाप्रमाणे सदर दावा अतिक्रमणीत जमिनीचा कब्जा मिळणेसाठी तसेच, निरंतर ताकीदीसाठी केलेला आहे. प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी क्र.२, ५, ७ यांनी नि.३४ कडे कैफियत दिलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफियत आल्यानंतर मे.कोर्टानी मुद्दे काढलेले आहेत. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये पॅरा नं.७ मध्ये रे.दि.मु.क्र.१९/१९८३ चा उल्लेख केलेला आहे व त्यावर सांगली येथील मे.जिल्हा कोर्टात रे.सि.अपील क्र.११५/१९८८ चे अपील केले होते. दि.२२.०४.२००४ रोजी सदर अपील रद्द करणेत आले व या दाव्यास रेस ज्युडिकेटा या तत्वाची बाधा येत आहे असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे व त्या रे.दि.मु.क्र.१९/८३ व रे.सि.अपील क्र.११५/८८ च्या निकालाची व हुकूमनाम्याची कागदपत्रे प्रतिवादींनी वादी व प्रतिवादी यांचा पुरावा संपल्यानंतर दाखल केले होते. परंतु प्रस्तुत दाव्यात दि.१३.०९.२००२ रोजी मे.कोर्टानी मुद्दे काढलेले आहेत व तसेच, वादीने दावा दुरुस्त केल्यानंतर प्रतिवादी यांची दुरुस्ती दाव्यास कैफियत आल्यानंतर जादा कैफियत दिलेली आहे. त्यानंतर नि.३८ कडे जादा मुद्दे दि.१७.११.२०१७ रोजी काढलेले आहेत. परंतु, सदर मुद्दयांमध्ये रेस ज्युडिकेटा या तत्वाबद्दल मुद्दा काढलेला नाही. तसेच, मे.कोर्टानी मुदतीबाबत Limitation चा अनावश्यक मुद्दा काढलेला आहे. तरी मे.कोर्टानी नि.३८ वरील मुद्दा क्र.१० Is the suit within limitation हा मुद्दा strike out करावा अशी विनंती केली आहे.

३. अतिक्रमणाचे दाव्यामध्ये सदरचा मुद्दा आवश्यक नसताना मे.कोर्टानी काढलेला आहे व प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२, ५ व ७ यांनी नि.३४ कडे कैफियत दिलेली आहे व कैफियत कलम ७ मध्ये पुर्वीचा रे.दि.मु.क्र.१९/८३ व रे.सि.अ.क्र.११५/८८ बाबत उल्लेख केलेला आहे व कागदपत्रे हजर केलेले आहेत. त्याबाबतचा मुद्दा म्हणजे Is suit bard by principle of res-judicata ? असा मुद्दा निघणे कायद्याने जरुरीचे आहे व तो मुद्दा काढून त्यावर वादी व प्रतिवादी यांना जादा पुरावा देणेस परवानगी असावी. सदर मुद्दा आवश्यक असून तो काढण्यात यावा व मुदतीबाबतचा मुद्दा स्ट्राईक आऊट करणेत यावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागील पानावर त्यांचे म्हणणे दिले आहे. मुद्दा क्र.१० हा कायद्याचा मुद्दा आहे. अतिक्रमणाचे दाव्यातसुध्दा मुदतीचा प्रश्न महत्वाचा आहे. तो मुद्दा कायम ठेवणेत यावा. Res-judicata चा मुद्दा काढणेत यावा असे प्रतिवादी यांनी अभिकथन केले आहे.

५. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिला. वादीने सदरचा दावा अतिक्रमण काढून कब्जा मिळणेबाबत व निरंतर ताकिदीकरिता केलेला आहे. वादीतर्फे विधीज्ञांनी सदर अर्जावर असे युक्तीवाद केले आहे की, प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीत मुदतीची तक्रार केली नाही. तसेच, प्रतिवादींनी त्यांचे नि.३४ कडील कैफियतीमध्ये परिच्छेद ७ मध्ये सदरच्या दाव्यास रेस ज्युडिकेटा या तत्वाची बाधा येते अशी तक्रार केली आहे. वादी यांनी पुढे असे युक्तीवाद केले आहे की, मुदतीचा कायदा कलम ६५ प्रमाणे अतिक्रमण काढून कब्जा मिळणेबाबतचा दाव्याला मुदतीचा कायदा लागु होत नाही. याऊलट प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असे युकतीवाद केले आहे की, त्यांनी नि.१८० कडे दाखल केलेले जादा कैफियतीत मुदतीबाबत तक्रार केली आहे.

६.		दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये रेस ज्युडिकेटा व दावा मुदतीत असल्याचे तक्रार केली आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी नि.३८ कडे दावा मुदतीत नसल्याचे मुद्दे काढले आहे. परंतु, दाव्यास रेस ज्युडिकेटा या तत्वाची बाधा येते याबाबत मुद्दे काढले नाही. अशी परिस्थितीत वादी यांचे अर्जाप्रमाणे मुद्दा क्र.१० हा strike out करता येणार नाही. तसेच, प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये केलेल्या तक्रारानुसार रेस–ज्युडिकेटा बाबत मुद्दा काढण्यात येत आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः–

**आदेश**

१. वादी यांचा नि.२३८ कडील अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. नि.३८ कडे रेस–ज्युडिकेटा या तत्वाबद्दल मुद्दे काढणेत येते.

Jyotimala Chandrashekhar Gupta
Digitally signed by Jyotimala Chandrashekhar Gupta
Date: 2020.01.07 15:08:17 +0000

**तासगांव.**		(श्रीमती जे.सी. गुप्ता)

दि.०३.०१.२०२०		सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर **तासगांव.**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil. |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 03.01.2020. |
| Order signed by the Presiding officer on | : | 07.01.2020. |
| Order uploaded on | : | 07.01.2020. |